# मूलमंत्र सहकाराचा..
# अखंडित जनसेवेचा..

**40 वा**
**वार्षिक अहवाल**
**2018 - 2019**
**ऑडीट वर्ग-अ**




**सहकारातील**
**नव्या पर्वाचा**
## शुभारंभ
**अत्याधुनिक सेवेचा**



# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् सहकारी असोसिएशन लि., कोल्हापूर

1458 बी.जी.एन. चेबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर-416 012
▪ E-mail: kopbankasso@gmail.com ▪ Website: kopbankasso.com

# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् सहकारी असोसिएशन लि.,कोल्हापूर



श्री. निपुण कोरे
अध्यक्ष



श्री. महेश धर्माधिकारी
उपाध्यक्ष



श्री. विजय भोसले
संचालक



श्री.अशोक सौंदत्तीकर
संचालक



श्री. राजेंद्र जाधव
संचालक



श्री. विठ्ठल मोरे
संचालक



श्री. अरुण अलासे
संचालक



श्री. शिरीश कणेरकर
संचालक



श्री. सुर्यकांत पाटील
संचालक



श्री. विलास नाईक
संचालक



श्री. दत्तात्रय थोरावडे
संचालक



श्री. प्रकाश पुजारी
संचालक



सौ. विजया जाधव
संचालिका



सौ. दिपा मिसाळ
संचालिका



श्री. दत्तात्रय राऊत
स्वीकृत संचालक



श्री. विश्वास चौगुले
स्वीकृत संचालक



कै. आनंदराव भोपळे
संचालक
दि. २७-०२-२०१९ पर्यंत



श्री. शंकर मांगलेकर
मुख्य कार्यकारी अधिकारी
दि. ३१-१०-२०१८ पर्यंत



श्री. अनिल नागराळे
मुख्य कार्यकारी अधिकारी
दि. १-११-२०१८ पासून

# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् सहकारी असोसिएशन लि., कोल्हापूर

सि. स. नं. १४५८ बी वॉर्ड, जी. एन. चेंबर्स, दुसरा मजला, कोळेकर तिकटी,
मंगळवार पेठ, कोल्हापूर.

जा. क्र. बँक्स असो./सर्वसभा/२०१९-२० /६६ दिनांक : १५ ऑक्टोबर २०१९

## वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना

**(फक्त सभासदांसाठी)**

कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि., कोल्हापूर या संस्थेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. ३० ऑक्टोबर २०१९ रोजी सायं. ४.00 वाजता सि. स. नं. १४५८ बी वॉर्ड, जी. एन. चेंबर्स, दुसरा मजला, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथील असोसिएशनच्या कार्यालयात खालील विषयांवर विचार करणेसाठी आयोजित केलेली आहे. सदर सभेस असोसिएशनच्या सभासद बँकांचे अध्यक्ष यांनी स्वतः अथवा सदर सभेस उपस्थित राहणेबाबत संचालक मंडळाचे ठरावाने अधिकार दिलेल्या संचालक यांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

## सभेपुढील विषय

१) दिनांक २८/०९/२०१८ रोजीच्या ३९ व्या वार्षिक सर्व साधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
२) सन २०१८-१९ चा वार्षिक अहवाल स्वीकृत करणे.
३) दिनांक ३१/०३/२०१९ रोजीचा लेखापरिक्षीत ताळेबंद व उत्पन्न खर्च पत्रक स्वीकृत करणे.
४) सन २०१८-१९ सालात अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास आणि सन २०१९-२० सालचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
५) दिनांक ३१/०३/२०१९ अखेर मिळालेल्या वाढावा विभागणीस मान्यता देणे.
६) सन २०१८-१९ च्या वैधानिक लेखा परिक्षक यांनी दिलेल्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व त्यावरील संचालक मंडळाने तयार केलेल्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
७) सन २०१९-२० सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना निश्चित करणे.
८) सन २०१९-२० सालच्या असोसिएशनच्या नियोजित शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमास मान्यता देणे.
९) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची गैरहजेरी क्षमापित करणेबाबत विचार करणे.
१०) मान. अध्यक्षांचे परवानगीने येणारे ऐनवेळच्या विषयावर विचार करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन

कोल्हापूर
दिनांक : १५ ऑक्टोबर २०१९

**श्री. अनिल अ. नागराळे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

टिप : १) सभेच्या ठरलेवेळेस गणपुर्ती न झालेस सभा तहकूब केली जाईल आणि अर्ध्या तासानंतर अशी तहकूब केलेली सभा सभेच्या सूचना पत्रात नमूद केले ठिकाणी घेणेत येईल. सदर सभेत वरील विषयांचा विचार करणेत येईल. अशा सभेला गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

२) सभासद बँकांनी सभेस उपस्थित राहणाऱ्या पदाधिकारी /संचालक यांची नांवे दिनांक २१/१०/२०१९ पर्यंत संचालक मंडळाच्या ठरावासह असोसिएशनकडे पाठवावीत.

३) सभासद बँकाना अहवालावरती सुचना अथवा प्रश्न विचारावयाचे असतील तर त्यांनी लेखी स्वरूपात दि. २१/१०/२०१९ पूर्वी असोसिएशनच्या मुख्य कार्यालयात पोहचतील अशा रितीने पाठवावयाचे आहेत.

# ४० वा वार्षिक अहवाल

**सन्माननीय सभासद बंधु भगिनींनो,**

असोसिएशनच्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संचालक मंडळाच्या वतीने मी आपले हार्दिक स्वागत करतो. दिनांक ३१.०३.२०१९ रोजी संपलेल्या अहवाल वर्षाचा लेखापरीक्षित ताळेबंद व वार्षिक अहवाल या सभेपुढे ठेवण्यास संचालक मंडळास विशेष आनंद होत आहे.

## आर्थिक परिस्थितीचा आढावा :

जागतिक बाजारपेठेतील आर्थिक उलाढालीचा वेग २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंदावला. सन २०१८-१९ च्या तिसऱ्या तिमाहीत अंतर्गत मागणीतील कमतरता व रोडावलेल्या औद्योगिक उलाढालीमुळे चीनमध्ये आर्थिक मरगळ जाणवली तर रशिया, दक्षिण आफ्रिका व ब्राझीलमध्ये देखील अंतर्गत तसेच बाहेरील मागणीतील अभावामुळे अर्थव्यवस्था मंदावली.

भारतीय अर्थव्यवस्था सन २०१९-२० या आर्थिक वर्षात सुमारे ७.२% वाढण्याची शक्यता सरकारच्या सांख्यिकीक विभागाने वर्तवली आहे. खाजगी व सरकारी मागणीतील अभावामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा वेग सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात सातत्याने तिसऱ्या तिमाहीत कमी झाला. या काळात निर्यातीचा दर कमी राहून कच्च्या तेलाच्या वाढत्या दरामुळे एकूण आयातीचे प्रमाण देखील मंदावले. खाजगी व सरकारी खर्चातील वाढीमुळे आगामी आर्थिक वर्षातील दुसऱ्या सहामाहीतील वेग पहिल्या सहामाहीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज या पतधोरणात रिझर्व्ह बँकेने व्यक्त केला आहे.

सुलभ तरलतेकरीता रिझर्व्ह बँकेने फेब्रुवारी २०१९ मध्ये रु. ३७५०० कोटी तर मार्च २०१९ मध्ये रु. २५००० कोटींचे सरकारी रोखे ओएमओ द्वारे खरेदी केले. अशा तऱ्हेने ओएमओ द्वारे रिझर्व्ह बँकेने सन २०१८-१९ आर्थिक वर्षात २९८५०० कोटी रुपयांची तरलता बँकिंग प्रणालीस उपलब्ध करून दिली आहे. फेब्रुवारी २०१९ मध्ये व्यापारातील तुटीने १७ महिन्यातील निचांक गाठला व त्याचा परिणाम चालू खात्यातील तुटीवरदेखील दिसून आला. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात FDI मध्ये वाढ होत दिनांक ३१.०३.२०१९ रोजी परकीय चलन साठा ४१२.९ बिलियन डॉलर पर्यंत वधारला.

सरकारने सन २०१९-२० वर्षाचा अर्थसंकल्प फेब्रुवारी २०१९ मध्ये सादर केला. या अर्थसंकल्पात वित्तीय तूट ३.४% तर चालू खात्यावरील तूट २.५% सरकारने अंदाजित केली आहे. अर्थसंकल्पाचा एकूण रोख अर्थव्यवस्थेचा वेग वाढवून ती ५ ट्रिलीयन डॉलरपर्यंत वृद्धिंगत करण्याकडे होता. तसेच सरकारी खर्चातील प्रस्तावित खर्चाचा भर पायाभूत क्षेत्र, आरोग्य, ग्रामीण औद्योगीकरण, शेती, स्वच्छ व सुरक्षित पर्यावरण तसेच डिजिटलायझेशन याकडे प्रामुख्याने दिसून आला.

आंतरराष्ट्रीय चलन बाजारात वर्षाच्या सुरुवातीस रुपयाचे डॉलरच्या तुलनेतील असलेले रु. ६५.१७ हे मूल्य वर्षाअखेरीस रु. ६९.१५ इतके उंचावले. रुपयाचे डॉलरच्या तुलनेतील वर्षातील न्युनतम मुल्य रु. ७४.४८ तर अधिकतम मूल्य रु. ६४.८५ नोंदले गेले. त्यामुळे परकीय चलनात सुमारे रु. १० च्या आसपास चढउतार पहावयास मिळाला.

**भारतीय बँकिंग प्रणाली :**

रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या सांख्यकीप्रमाणे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात व्यापारी बँकाच्या ठेवी रु. १०६५५ लाख कोटींनी वृद्धिगंत होवून वाढीचा दर ९.५% राहिला. ठेवींच्या तुलनेत कर्जाच्या वाढीचा दर या वर्षात जास्त राहिला असून व्यापारी बँकांची कर्जे रु. ११७६३ लाख कोटींनी वृद्धिगंत होवून वाढीचा दर १४% राहिला. अशारितीने वर्षाअखेरीस बँकिंग प्रणालीतील एकूण ठेवी रू. १२२ लाख कोटींहून अधिक तर एकूण कर्जे रू ९५ लाख कोटींहून अधिक राहिली.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात व्याजदरातील बदल मिश्र स्वरूपाचे होते. वर्षाच्या सुरुवातीस ६% असलेल्या रेपो दरात रिझर्व्ह बँकेने जून २०१८ व ऑगस्ट २०१८ मध्ये प्रत्येकी पाव टक्क्याची वाढ केली. परंतु सातत्याने कमी होत असलेल्या महागाई दराच्या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेने फेब्रुवारी २०१९ व एप्रिल २०१९ मध्ये रेपो दरात प्रत्येकी पाव टक्क्याची कपात करीत हा दर पुन्हा एकदा ६% वर आणला. रेपो दरात रिझर्व्ह बँकेने केलेल्या सदर कपातीनंतर देखील बँकांचे व्याजदर कमीअधिक प्रमाणात स्थिरच राहिले. काही सरकारी बँकांनी त्यांच्या कर्जदरात ०.०५% ते ०.१०% इतकी माफक कपात केली तर तरलते अभावी घाऊक ठेवींचे दर मात्र याच काळात उंचावले गेले.

भारतीय सरकारने थकीत कर्जाची जलद गतीने वसुली होण्याकरिता सन २०१७ मध्ये INSOLVENCY & BANKRUPTCY CODE BILL पास केले होते. या अनुषंगाने रिझर्व्ह बँकेने PUBLIC CREDIT REGISTRY (PCR) च्या माध्यमातून डेटाबेस तयार केला असून बँकांना वसुली करीता महत्त्वाची माहिती याद्वारे प्राप्त करता येते. आजच्या घडीस NATIONAL COMPANY LAW TRIBUNAL (NCLT) कडे बँकांद्वारे दाखल केलेल्या प्रकरणाची संख्या जास्त नसली तरी एकूण दाखल झालेल्या प्रकरणांपैकी ७५% म्हणजेच सुमारे रु. १.७ लाख कोटी रुपयाची वसुली या माध्यमातून झालेली आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात अनुत्पादित कर्जाची वसुली करणे हे व्यापारी बँकांसमोर मोठे आव्हान होते. परंतु या आव्हानात्मक परिस्थितीत देखील व्यापारी बँकांची ढोबळ अनुत्पादक कर्जे पहिल्या सहामाहीत ११.५% व १०.८% पर्यंत कमी झाली.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस रिझर्व्ह बँकेच्या PROMPT CORRECTIVE ACTION (PCA) अंतर्गत ११ सरकारी बँकांचा सहभाग होता. परंतु वर्षाअंतर्गत

रिझर्व्ह बँकेने यातून ५ बँका बाहेर काढून वर्षाअखेरीस PCA अंतर्गत एकूण ६ सरकारी बँका समाविष्ट दिसत आहेत.

**स्थानिक घडामोडी :**

नजीकच्या गतकाळात काही अकल्पित घटना घडल्या आणि आपल्या सभासद बँका हडबडून गेल्या. पहिली घटना सायबर हल्ल्याबाबत, घटना घडल्यानंतर असे वाटू लागले की, आपण आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून संगणक युगात धडाडीने वाटचाल करतोय खरे । पण आपण निवडलेली उपकरणे खरोखरच १००% सुरक्षित आहेत का ! आपल्या संस्थेत दिवसरात्र जीव तोडून संगणक विभागात राबणारे लोक काही बाबतीत अनभिज्ञ तर नाहीत? आय. एम. पी. एस. माध्यमाद्वारे दूर शहरात राहणाऱ्या हॅकर्सनी आपल्या अन्य बँकांत असणाऱ्या खात्यांवरून शिल्लक असणाऱ्या रक्कमेवर दरोडा घातला. अशा घटनानंतर रिझर्व्ह बँकेनेही अध्यादेश पाठवायला सुरुवात केली. वास्तविक बँकांना सायबर सुरक्षा वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागणार आहे. या ठिकाणी काटकसरीचा विचार करु नये. पण सध्या तरी तसे होत नाही. खरेतर येत्या काही वर्षात बँकांनी इतर माध्यमातून होणाऱ्या खर्चात बचत करून तो पैसा या कामी वळवावा असे वाटते.

यानंतर अलिकडे पंजाब आणि महाराष्ट्र बँकेनेही चुकीचे व्यवहार करून सहकारी क्षेत्रातील काळा इतिहास लिहिण्याचे दुर्दैवी काम केले. रिझर्व्ह बँकेच्या या पूर्वीच्या काही तपासणीमध्ये याबाबी निदर्शनाला आल्या नाहीत हे आणखी एक दुर्दैव. या घटनेबाबत सामुहिकपणे योग्य तोडगा काढण्यासाठी आपणांस प्रयत्न करावा लागणार आहे. मागील आर्थिक वर्षात जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांनी केलेला व्यवसाय, त्यांची आर्थिक परिस्थिती जागतिक मंदीच्या परिस्थितीमुळे आणि जिल्ह्यातील महाप्रलयी महापुरामुळे यथातथाच राहिली, अनेक नागरी सहकारी बँकांची या बँकेत गुंतवणूक होती व ती रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकास अनुसरूनच केली होती. त्याबाबत या बँकांना त्रास होऊ नये यासाठी रिझर्व्ह बँक तसेच शिखर संस्थांकडे असोसिएशन मार्फत योग्य तो पाठपुरावा केला जात आहे. त्याच प्रमाणे ऑटोमाबाईल क्षेत्रातील मंदी, महाप्रलयी, महापुर या दोन्हीमुळे पश्चिम महाराष्ट्रातील अनेक बँकातील खाती ही एनपीए होत आहेत.त्याबाबत एक वर्षांसाठी हप्ते व व्याज भरणेस मुदत देणेबाबत ही असोसिएशन मार्फत पाठपुरावा केला जात आहे. ज्याचा फायदा सर्वच सभासद बँकाना होऊ शकेल आपल्या सभासद बँका प्रतिकूल परिस्थितीमध्येही सक्षमपणे कार्यरत रहाव्यात यासाठी असोसिएशन नेहमी प्रयत्नशील असते. याविषयी सविस्तर अहवाल पुढे दिला आहे.

## सभासद व वर्गणी

गत अहवाल साला अखेर एकूण ४७ बँका सभासद असून पैकी शिवम् सहकारी बँक लि., इचलकरंजी बंद झाल्याने अहवाल साल अखेर एकूण ४६ नागरी सहकारी बँका नियमीत सभासद आहेत. आपल्या जिल्ह्यात शाखा असणाऱ्या परंतु कोल्हापूर जिल्ह्याबाहेर नोंदणीकृत कार्यालये असणाऱ्या १० बँका सहयोगी सभासद झालेल्या आहेत. कायदा कलम १०१ वसुली दाखले प्राप्त करणेच्या कामी प्रामुख्याने या सहकारी बँका आपले सभासदत्व स्वीकारत असतात.

सन २०१७-१८ अहवाल वर्षात रु. ३,०२,५००/- इतकी वर्गणी जमा झालेली आहे.

## * गंगाजळी व निधी

अहवाल वर्षात गंगाजळी व राखीव निधीत रु.२८,३०,६७६.०८ ची वाढ होवून असोसिएशनकडे दि.३१ मार्च २०१९ वर्षाखेरीस रु.३,६३,८१,६३८.२० इतकी गंगाजळी व निधी निर्माण झालेला आहे.

## * उत्पन्न व खर्च

सभासद वर्गणी, गुंतवणूकीवरील व्याज, प्रोसेस फी, दावा खर्च भरपाई शुल्क, प्रशिक्षण शुल्क हे असोसिएशनचे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत आहेत. यामधून अहवाल वर्षात असोसिएशनला रु.५१,०१,१७८.५६ इतके उत्पन्न मिळाले आहे. अहवाल वर्षात असोसिएशनच्या गुंतवणूकीत रु.२५,००,०००.०० ची वाढ झाली आहे.

कर्मचारी वेतन, मानधन, अधिलाभांश, सानुग्रह अनुदान, स्थानापन्न भत्ता, प्रशिक्षण आणि घसारा व व्यवस्थापनावर रु. ३१,२५,६९३.४२ इतका खर्च झालेला आहे. असोसिएशनच्या वसुली कक्षाकडे सहकार खात्याकडील उपनिबंधक दर्जाचा अधिकारी असल्याने त्यांचे वेतन भत्त्यावर जादा खर्च होत आहे. वसुली दावे दाखल करणाऱ्या बँकाकडून वसुली कक्ष खर्च भरपाई शुल्क घेवून कांही प्रमाणात तोटा कमी करणेचा प्रयत्न केला जात आहे. तथापि अहवाल वर्षात सहाय्यक निबंधकांच्या स्तरावरील अधिकाऱ्यांकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार नसल्याने त्यांचे वेतन, भत्त्याचा खर्चामध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे अहवाल सालात वसुली कक्षाकडील तोटा रु. ९,७५,४४०.३० इतक्या रकमेपर्यंत झाला आहे.

सन २०१८-१९ चे अंदाज पत्रकीय खर्चापेक्षा कांही बाबीवर जादा खर्च झाला आहे. त्याचा तपशील अहवालात दिलेला आहे.

## * वाढावा व वाढावा विभागणी

दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या अहवाल वर्षात असोसिएशनच्या व्यवस्थापन व आस्थापनेवर झालेला एकूण खर्च आणि करावे लागणाऱ्या वैधानिक तरतुदी एकूण उत्पन्नातून वजावट केलेनंतर वर्षाखेरीस रु.१९,७५,४८५.१४ इतका वाढावा शिल्लक रहात आहे. त्याची विभागणी खालीलप्रमाणे करावी अशी शिफारस संचालक मंडळाने केलेली आहे.

| | |
|---|---|
| राखीव निधी | ८,६९,२१३.१४ |
| इमारत निधी | १,५०,०००.०० |
| प्रशिक्षण निधी | ७५,०००.०० |
| परितोषिक निधी | ७५,०००.०० |
| संभाव्य देयता निधी | ५,००,०००.०० |
| प्रशिक्षण केंद्र निधी | १,७५,०००.०० |
| तंत्र विकास निधी | १,३१,२७२.०० |
| | **१९,७५,४८५.१४** |

## * अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षण

सन २०१८-१९ चे वैधानिक लेखापरिक्षण मे. सुशांत फडणीस आणि कं. सनदी लेखापाल, कोल्हापूर यांनी पूर्ण केले आहे. त्यांनी असोसिएशनच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करुन असोसिएशनला अहवाल वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग **"अ"** प्रदान केलेला आहे. त्यानी दिलेल्या मार्गदर्शक सहकार्याबद्दल असोसिएशन आभारी आहे.

## * वसुली कक्ष व दावे आढावा

सहकार खात्याकडील उपनिबंधक दर्जाचा अधिकारी परसेवेवर या कार्यालयाकडे पूर्णवेळ कार्यरत असतो. तसेच या कक्षाचे कामकाजासाठी स्वतंत्र कार्यालयीन इमारत, साधन सुविधा आणि कर्मचारी वर्ग दिला आहे. सध्या बँका काळजीपुर्वक कर्ज वाटप करित असून थकबाकी वसुलीसाठी सिक्युरायटेझशनचा जादा वापर करीत आहेत.

वसुली कक्षाकडील उपनिबंधक श्री. धायगुडेसाहेब यांची बदली फलटणचे जिल्हा उपनिबंधक म्हणून झालेनंतर असोसिएशन वसुली कक्षाकडे दि. २१ जून २०१८ पासून डॉ. महेशकुमार यशवंतराव कदम, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांची बदली झाली आहे. ते पूर्णवेळ कामकाज पहात असून त्यांचा अनुभव, कामकाज पद्धती आणि तत्पर कार्यपद्धती लक्षात घेता दाव्यांचे निर्णय लवकरात लवकर होत आहेत. बॅकांचे वसुली कार्यवाही तत्पर होणेस त्यांची मदत होणार आहे. तेव्हा बँकानी दावा प्रकरण जास्तीत जास्त दाखल करावीत असे सदस्य बँकांना विनंती करीत आहे.

दि. ३१ मार्च २०१८ पूर्वीचे २१४ इतके दावे प्रलंबित होते. सन २०१८-१९ अहवाल वर्षात ८३० इतके नवीन दावे दाखल झालेले आहेत. अहवाल वर्षात १०१५ दाव्यांची रु. ७०.३९ कोटी रक्कमेचे निकाल देवून दाखले दिलेले आहेत. अहवाल वर्षाखेरीस रू. ५.६१ कोटी रकमेचे २९ दावे प्रलंबित आहेत.

## * नोंद घेण्यासारख्या महत्त्वाच्या बाबी

१. देशातील बँकींग क्षेत्र अद्ययावत होत असून जिल्ह्यातील बँकींग क्षेत्राला आदर्शवत करण्यासाठी व नवतंत्रज्ञानाची जोड देऊन कामकाजामध्ये अधिक सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न केला आहे व त्यासाठी असोसिएशनने आपले स्वतःचे संकेतस्थळ www.kopbankasso.com सुरु केले आहे. त्यामुळे असोसिएशनचे उद्देश, व्यवस्थापन, बँक मार्गदर्शन, शासकीय परिपत्रके, प्रशिक्षण कार्यक्रम आणि कलम १०१ दावा स्थिती इत्यादी माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध होणार आहे. सदर वेबसाईट मे. व्ही स्काय सोल्युशन्स प्रा. लि., कोल्हापूर यांनी अल्प काळात, अद्यावत व आदर्शवत अशी केली आहे.

२. पतसंस्था फेडरेशनकडील जिल्ह्यातील दावे बँक असोसिएशनचे उपनिबंधक (परसेवा) यांचेमार्फत निकाली काढण्यासाठी सहकार आयुक्त पुणे यांचेमार्फत महाराष्ट्र शासनाची मान्यता नुकतीच मिळाली असून त्याप्रमाणे पुढील कामकाज चालू आहे. असोसिएशनच्या होणाऱ्या खर्चापैकी काही भार या मार्फत उचलला गेल्याने असोसिएशनला याचा फायदा होणार आहे.

३. महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोउद्योग विभाग शासन आदेशानुसार राज्यातील नागरी सहकारी बँकामधील नोकरभरती प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविणेबाबत कळविले आहे. सदर परिपत्रकामधील अर्हता प्राप्त केलेल्या नामांकित संस्थांच्या यादी मधील वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ को. ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट (VAMNICOM) या संस्थेची निवड करुन सदर संस्थेबरोबर ऑनलाईन नोकरभरती करणेचा दिनांक १६/०९/२०१९ रोजी सामंजस्य करार झालेला असून आपल्या असोसिएशनला अभिकर्ता म्हणून मान्यता दिलेली आहे. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकेच्या नोकरभरतीप्रमाणे नागरी सहकारी बँकांसाठी एकत्रित परीक्षा व मुलाखतीची प्रक्रिया राबविली जाईल

आणि वेळही कमी लागेल तरी सभासद बँकांनी नोकरभरती करावयाची झाल्यास असोसिएशनकडे कळविणेत यावे. सभास बँकाना याबाबत येत असलेल्या अडचणी या निर्णयामुळे कमी होणार आहेत.

४. कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे प्रशिक्षण कार्यक्रमाबरोबर कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणेस व अभिकर्ता म्हणून नेमणूक होणेसाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे यांचेकडे मंजूरीस पाठवला असून नजिकच्या काळात त्यास मंजूरी मिळेल असे वाटते.

५. जुलै व ऑगस्ट २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी होऊन महापूर आला. या नैसर्गिक आपत्तीमुळे सभासद बँकांचे ग्राहक, कर्जदार, सभासद यांचे, शेती, उद्योग, व्यापार व्यवसाय व पशुधन इतर मालमत्तेचे नुकसान झाले आहे. त्यामुळे कर्जदारांचे आर्थिक नुकसान झाल्यामुळे सभासद बँकांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड वेळेत होऊ शकणार नाही. त्याचा परिणाम बँकांची थकबाकी तसेच एनपीए वाढणार आहे असल्याने बँकांची आर्थिक स्थिती सुस्थितीत राहण्यासाठी काही सदस्य बँकांनी सूचना केलेनुसार अनुत्पादक जिंदगी निकषामध्ये सवलत मिळण्याचे उद्देशाने असोसिएशन कडून महाराष्ट्र राज्य फेडरेशन व सहकार भारती यांचे मार्फत प्रस्ताव पाठविलेला असून त्यांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाकडे पाठपुरावा करणेस विनंती केली आहे.

६. तसेच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिनांक २०/०९/२०१९ रोजी पब्लिक सेक्टर अंडरटेकींग बँकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मिटींग घेऊन सूक्ष्म, लघू आणि मध्यम एंटरप्रायजेस (MSME) मधील कर्जे पुनः संचयीत करणेसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाला सूचना केल्याचे पत्रकार परिषदेमध्ये जाहीर केले. जागतिक व देशातील आर्थिक मंदीचा परिणाम आमचे जिल्ह्यासह सर्व महाराष्ट्र राज्यामध्ये आहे. अशी सूक्ष्म, लघू आणि मध्यम एंटरप्रायजेस (MSME) मधील कर्जे सर्व नागरी सहकारी बँकांकडे आहेत व त्याबाबत सवलत मिळावी यासाठी महाराष्ट्र राज्य फेडरेशन लि; मुंबई, नॅफकॅब व सहकार भारती यांचेमार्फत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे पाठपुरावा करणेविषयी विनंती केली आहे.

## * संचालक मंडळ व सेवक वृंद

अहवाल सालात संचालक मंडळाच्या ७ तर कर्मचारी उपसमितीच्या ३ सभा झालेल्या आहेत. तसेच संचालक मंडळ नियुक्त बँक्स असोसिएशन पारितोषिक माहिती व तंत्रज्ञान सल्ला अधिकारी समुहांच्या बैठका घेणेत आलेल्या आहेत.

अहवाल वर्षअखेर असोसिएशनकडे मुख्य अधिकाऱ्यासह चार सेवक कार्यरत होते. सेवक वर्गांनी प्रामाणिकपणे काम करून असोसिएशनचे कामकाजाला गतिमानता देण्याचा प्रयत्न केला आहे. याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

## * प्रशिक्षण व प्रबोधन

सहकार कायदा कलम २४ (अ) प्रमाणे शासनाने अधिसुचित केलेल्या संस्थाकडून सभासदांना शिक्षण व पदाधिकारी कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले तरच ते विधीग्राह्य धरले जात असल्याने आपल्या असोसिएशनने महाराष्ट्र राज्य सहकारी संघ यांचेबरोबर शिक्षण/प्रशिक्षणाबाबत सामंजस्य करार केला आहे. ज्या बँकांना अशा संस्थांचे प्रशिक्षण व प्रमाणपत्रे आवश्यक असतील त्यांचेकरिता असोसिएशन मार्फत प्रशिक्षण घेतले जाते. प्रशिक्षण केद्रांची जागा अपुरी पडू लागल्याने संचालक मंडळ सभागृह एकत्र करून अद्यावत ध्वनीयंत्रणेसह केंद्राचे नुतनीकरण केले आहे. हॉटेलमध्ये प्रशिक्षणासाठी होणारा अनाठायी खर्च कमी करून माफक शुल्कात उत्तम शिक्षण-प्रशिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. त्याचा फायदा सर्व बँकानी घ्यावा अशी विनंती आहे.

अहवाल वर्षात आयकर कायद्यातील बदल, सहकार कायद्यातील सुधारणा, सायबर सिक्युरिटी इत्यादी नवीन कायद्याबाबत बँकांचे पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांना माहिती प्रशिक्षण दिले आहे. ग्राहकसेवा, तंत्रज्ञानयुक्त बँकींग व त्यामधील धोके, मनुष्यबळ ग्राहक पतमानांकन, कर्ज मुल्यांकन वसुली व्यवस्थापन, माहिती व तंत्रज्ञान लेखापरिक्षण प्रोत्साहन प्रशिक्षण कार्यक्रमाना कोल्हापूरसह सांगली-सातारा जिल्ह्यातील बँकांनाही सामावून घेण्याची परंपरा पुढे चालू ठेवलेली आहे. शिक्षण प्रशिक्षणाबरोबरच बँकातील कर्मचारी भरती, पदोन्नती, लेखी परिक्षा, मौखिक मुलाखतीद्वारे घेवून मनुष्यबळाची गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रशिक्षण कार्यक्रमासाठी आपल्याच सदस्य बँकांतील अधिकारी यांना प्रोत्साहित करून प्रशिक्षण वक्ते म्हणून संधी देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## * सदस्य बँकाची प्रगती व पारितोषिके योजना

देशपातळीवर व्यापारी व सरकारी बँकात आर्थिक घोटाळे घडत असताना असोसिएशनच्या सदस्य बँका आपल्या गुणात्मक प्रगतीमध्ये सातत्य ठेवून आहेत. देशातील अनेक मोठ्या बँका तोट्यात जात असताना सहकारी बँका नफ्यात आहेत. गतवर्षी सरकारी बँकाचा ढोबळ एनपीए १० टक्केपेक्षा जास्त असताना आपल्या बँकाचा ढोबळ एनपीए ५ टक्क्यापेक्षा कमी आहे. यावरून आपल्या बँका अत्यंत कार्यक्षमपणे कार्यरत आहेत आणि प्रगतीपथावर आहेत हे पुढे दिलेल्या सन २०१८-१९ चे आकडेवारीवरून स्वयंस्पष्ट होत आहे.

| तपशील | आकडे कोटीत |
|---|---|
| भागभांडवल व निधी | १३६९.७७ |
| ठेवी | ११२५९.५३ |
| कर्जे | ६६९८.६८ |
| गुंतवणूक | ४१३४.११ |
| एकत्रित व्यवसाय | १७९५८.२१ |
| नक्त नफा | ८१.०३ |
| शाखा संख्या | ४९० |
| कर्मचारी संख्या | ३८५९ |
| बहुराज्य बँका (Multi State Bank) | ४ |
| शेड्युल्ड बँका व बहुराज्य | १ |
| शाखारहीत बँका (Unit Banks) | ६ |
| सर्वसाधारण बँका (Licensed) | ४६ |
| नियमीत सदस्य बँका | ४६ |
| नाममात्र सदस्य बँका | १० |

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अध्यादेशानुसार भांडवल पर्याप्तता, नफाक्षमता व अनुत्पादक जिंदगीचे प्रमाण हे निकष जवळ जवळ सर्वच सदस्य बँका पूर्ण करीत आहेत. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम व व्यवस्थापकीयदृष्ट्या उत्तम (Financial Sound and Well Managed Banks) असणाऱ्या बँकांच्या यादीत बहुतांशी बँकांचा समावेश आहे. सदस्य बँकांनी संपादन केलेल्या या गुणात्मक प्रगतीमागे बँकांचे चेअरमन, संचालक, व्यवस्थापक तसेच सेवकवृंदाचे अथक परिश्रम आहेत यात शंका नाही. त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांबद्दल मी त्यांचे हार्दिक अभिनदंन करत आहोत.

कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकाचे पालकत्व स्वीकारलेली जिल्हास्तरीय शिखर संस्था या नात्याने असोसिएशन आपली जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न करित आहे. बँकाच्या समस्या सोडविणे बरोबरच त्यांच्या उत्तम कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक करणे हे ही आमचे कर्तव्य आहे, म्हणूनच सन २०१७ पासून ठेवनिहाय्य गटवार पारितोषिके देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमामध्ये एकूण २१ बँकांनी सहभाग घेतला होता. या बँकांकडून आलेल्या प्रस्तावांची निष्पक्ष छाननी व्हावी म्हणून एक सेवानिवृत्त बँकीग तज्ञ व दोन सनदी लेखापाल यांची पारितोषिक निवड समिती नेमली होती या समितीने प्रस्तावांची छाननी करुन दि. ३१ मार्च २०१९ वर्षाखेरीच्या उत्तम प्रगतीप्रित्यर्थ सभासद बँकांची सन २०१९ चे पारितोषिकासाठी पुढीलप्रमाणे निवड केलेली आहे.

**अ) २५१ कोटीवरील ठेवी /गट क्रमांक १ :**
**श्री महालक्ष्मी को. ऑप बँक लि., कोल्हापूर**

**ब) १०१ ते २५० कोटीपर्यंत ठेवी /गट क्रमांक २ :**
**नांदणी सहकारी बँक लि., नांदणी**

**क) ५१ ते १०० कोटीपर्यंत ठेवी/गट क्रमांक ३:**
**कोल्हापूर महिला सहकारी बँक लि., कोल्हापूर**

**ड) ५० कोटीपर्यंत ठेवी/गट क्रमांक ४ :**
**विश्वनाथराव पाटील मुरगुड सह. बँक लि., मुरगुड**

पारितोषिक विजेत्या बँकाचे चेअरमन, संचालक, व्यवस्थापक व कर्मचारी यांचे आम्ही मनापासून अभिनंदन करत आहोत. तसेच जास्तीत जास्त बँकानी या उपक्रमात सहभागी व्हावे आणि प्रस्ताव वेळेत सादर करावेत असे आवाहन ही करतो.

## * संकल्प व समारोप

सन, २०१९-२० मध्ये बँक संचालक अधिकारी यांचे अभ्यास दौरे आयोजित करणे, बँकांतील सध्याच्या नवनियुक्त कर्मचारी यांना माहिती तंत्रज्ञानाचे बऱ्यापैकी ज्ञान असले तरी प्रत्यक्ष बँकींग व्यवहाराची जाण कमी आहे, त्याकरिता विशेष प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे, बँकेतील श्रेणीनिहाय कर्मचारी/अधिकारी वर्गासाठी निरंतर कार्यशाळा सुरु करणे, तंत्रज्ञानयुक्त बँकींगमधील धोक्यांच्या व्यवस्थापनाची माहिती व्हावी म्हणून कार्यशाळा आयोजित करणे, सभासद शिक्षण पुस्तिका काढणे, १०१ वसुली दाखल्यातील बँकांकडील आढावा बैठका घेणे इत्यादी उपक्रम सुरू राहण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

व्यावसायिक स्पर्धेबरोबरच उच्च पदस्थ सक्षम मनुष्यबळाची कमतरता, माहिती व तंज्ञज्ञानाचे आर्थिक गुन्हे, उच्च पदस्थ हल्ले थोपविण्यासाठी निर्माणकरावयाची संगणकीकरणाची खर्चीक यंत्रणा व माहिती तंत्रज्ञानातील प्रामाणिक मनुष्यबळाची कमतरता,त्यांच्या वेतनावर करावा लागणारा भरमसाठ खर्च, रिझर्व्ह बँक, सरकार यांची सहकाराबद्दलची अनास्था अशा अनेक समस्यांतून सहकारी बँकांना पुढे टिकून राहवयाचे आहे. त्याचबरोबर येत्या वर्षात डिजीटल बँकीगचे युग, (Digital Banking Era) कोणत्याही बँकेचे खातेतील व्यवहार कोणत्याही बँकेतून उपलब्ध (Bank Account Portability) देशपातळीवर एक व्यक्ती एक खाते (Aadhar Based Block Chain) असे क्रांतीकारी बदल बँकींग व्यवहारात होणार आहेत. यासाठी बँकांनी तंत्रज्ञानयुक्त बँकींगवर लक्ष केंद्रीत करून अद्यावत यंत्रणा व त्यासाठी सक्षम मनुष्यबळ निर्माण करणे गरजेचे आहे. यासाठी आवश्यक असणारे मार्गदर्शन देण्यास असोसिएशन कटिबध्द आहे याची आपणांस ग्वाही देतो.

## * आभार

आपल्या असोसिएशनला मा. श्रीकृष्ण वाडेकर, विभागीय सहनिबंधक, श्री. अरुण काकडे जिल्हा उपनिबंधक, डॉ. महेश कदम, शिवाजी विद्यापीठ प्रशासन व निमशासकीय कार्यालये, सामाजिक संस्था, बँका आणि त्यांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांनी कामकाजात प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहकार्य केलेले आहे. असोसिएशनच्या काही सदस्य बँकांनी गरजेवेळी मनुष्यबळ, साधन-सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्याबद्दल सर्वांचे मन:पुर्वक आभारी आहोत.

अहवाल वर्षातील कामकाजाचा आढावा आणि दि. ३१ मार्च २०१९ अखेरची आर्थिक पत्रके, पुढील वर्षीचे अंदाजपत्रक, मागील अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेला खर्च, लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवाल, पुढील वर्षीचा कार्यक्रम इत्यादी पत्रके सभेपुढे विचारार्थ सादर केलेली आहेत. त्यास आपण मंजुरी द्यावी अशी विनंती आहे.

मा. संचालक मंडळाचे वतीने

दि. १५ ऑक्टोबर २०१९

**श्री. निपुणराव कोरे**
अध्यक्ष

## जय सहकार



# * ऋण निर्देश *

*सहकार विशेषत: बँकींग क्षेत्रात कित्येक तपे दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शकाची भूमीका सक्षमपणे ज्यांनी पार पाडली. आज सहकारी बँकींग एका संक्रमण अवस्थेतून मार्गक्रमण करित असताना ज्यांच्या कणखर नेतृत्वाची व अनुभवी विचारांची उणीव भासते. त्या ॲड. कै. शामरावजी शिंदे यांचे असोसिएशन सदैव ऋणी रहाणार आहे.*

# भावपुर्ण श्रद्धांजली

असोसिएशनचे संचालक श्री. आनंदराव भोपळे
माजी अर्थमंत्री श्री. अरुण जेटली, परराष्ट्र मंत्री सौ. सुषमा स्वराज,
श्री. मनोहर पर्रीकर तसेच महाराष्ट्रमधील नैसर्गिक आपत्तीमध्ये निधन झालेल्या
व्यक्ती तसेचसहकार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय,
इत्यादी क्षेत्रातीलमहनीय व्यक्ती सैन्यदलातील जवान आणि मानवजातीसाठी
त्यागी वृत्तीने कार्य केले व निधन पावले अशा
ज्ञात-अज्ञात व्यक्ती तसेच सदस्य बॅकांचे निर्वतलेले
सभासद अशा सर्वांना असोसिएशन तर्फे

भावपूर्ण श्रद्धांजली

## दिनांक ३१/०३/२०१९ रोजीचा ताळेबंद

| दि. ३१ मार्च २०१८ | भांडवल व देणी बाजू | पोट रक्कम | दि. ३१ मार्च २०१९ |
|---|---|---|---|
| -- | **भांडवल / निधी** | -- | ३,६३,८१,६३८.२० |
| १,०१,००,००१.०० | राखीव निधी | ११२४३३६१.०३ | |
| ५९,००,०००.०० | इमारत निधी | ६१०००००.०० | |
| ६,००,५०७.९५ | प्रशिक्षण निधी | ७०००००.०० | |
| १३,६६३.५० | अधिवेशन निधी | १३६६३.५० | |
| ३,००,०००.०० | सभा समारंभ निधी | ३०००००.०० | |
| २५,९४,६८३.१७ | इमारत घसारा निधी | २८४०९९७.१७ | |
| ९९,०७,७५८.३५ | संभाव्य देयता निधी | १०५०००००.३५ | |
| ८,५६,७९७.१५ | तंत्रविकास निधी | ९९१०००.१५ | |
| ५,३०,०००.०० | बँक्स संचालक अभ्यास दौरा निधी | ६५००००.०० | |
| १,४२,६१६.०० | तंत्र विकास निधी | १४२६१६.०० | |
| २,००,०००.०० | नैसर्गिक आपत्ती निधी | २०००००.०० | |
| २१,०४,९३५.०० | प्रशिक्षण केंद्र निधी | २३०००००.०० | |
| १,००,०००.०० | बँक ठेव संशयीत निधी | १०००००.०० | |
| २,००,०००.०० | पारितोषिक निधी | ३०००००.०० | |
| | **देणी** | -- | ८,०३,०४८.६८ |
| ५८,५००.०० | याचिका फी अनामत | ५८५००.०० | |
| ५४,७२५.०० | लेखापरिक्षण फी देणे | ५४७२५.०० | |
| ८,५४४.०० | देणे बील्स् | ६२९९.०० | |
| १,०१,९११.०० | अधिलाभांश/सानुग्रह अनुदान | ११३१८२.०० | |
| २,२२५.०० | आयकर देणे | ७२२५.०० | |
| ७७५.०० | व्यवसाय कर देणे | ९५०.०० | |
| ४,९९,८३४.५८ | असोसिएशन देणे (दुबेरजी नोंद) | ३६५२८.५० | |
| ९,३८०.०० | सल्ला फी देणे | ४३८०.०० | |
| १,४१६.०० | प्रशिक्षण फी देणे | ०.०० | |
| ७३,७४६.०० | जीएसटी देणे | २६६६५.१८ | |
| ९,७१०.०० | ॲडव्हान्स प्रशिक्षण फी | ०.०० | |
| ८५,५००.०० | वार्षिक वर्गणी (दुबेरजी नोंद) | ६३०००.०० | |
| १,२५,०००.०० | याचिका खर्च देणे | १२५०००.०० | |
| ०.०० | प्रतिमा संवर्धन | २६२६००.०० | |
| ०.०० | टेंडर डिपॉझीट | ३६०३४.०० | |
| ०.०० | ॲडव्हान्स वार्षिक वर्गणी | ५०००.०० | |
| ०.०० | जी आय एस देणे | ९६०.०० | |
| ०.०० | जी पी एफ/जी आर पी / ए बी सी देणे | २०००.०० | |
| २५,८४,३६२.०८ | **वाढावा** | | १९,७५,४८५.१४ |
| **३,७१,६६,५९०.७८** | **एकूण** | | **३,९१,६०,१७२.०२** |

**श्री. अनिल नागराळे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

सदर दिनांकीत अहवालाप्रमाणे

**सीए सुशांत फडणीस**
सुशांत फडणीस आणि कंपनी
सनदी लेखापाल, वैधानिक लेखापरिक्षक

श्री. विजय भोसले
श्री. अरुण आलासे
श्री. दत्तात्रय थोरावडे
सौ. दिपा मिसाळ
श्री. अशोक सौंदत्तीकर
श्री. शिरीष कणेरकर
श्री. प्रकाश पुजारी
श्री. दत्तात्रय राऊत
श्री. राजेंद्र जाधव
श्री. सुर्यकांत पाटील
श्री. विश्वास चौगले
श्री. विठ्ठल मोरे
श्री. विलास नाईक
सौ. विजया जाधव

## दिनांक ३१/०३/२०१९ रोजीचा ताळेबंद

| दि. ३१ मार्च २०१८ | जिंदगी व येणी बाजू | पोट रक्कम | दि. ३१ मार्च २०१९ |
|---|---|---|---|
| -- | **रोख व बँकेतील शिल्लक** | -- | ३,४७,४१७.५२ |
| ५४८.०० | अ) रोख शिल्लक | २,१६६.०० | |
| ६,५७,४६२.७२ | ब) सेव्हिंग्ज खाते | ३,४५,२८१.५२ | |
| | **गुंतवणूक** | -- | ३,३०,००,०००.०० |
| ३,०५,००,०००.०० | मुदत ठेवी | ३,३०,००,०००.०० | |
| | **मालमत्ता** | | ४२,८३,५०५.०० |
| २४,६३,१६६.०० | असोसिएशन/वसुली कार्यालय | २४,६३,१३६.०० | |
| ७,८४,८६१.०० | फर्निचर, फिटींग, फिक्चर्स | १२,३६,५४२.०० | |
| १,०९,००८.०० | इमारत फिंटींग्ज् फिक्चर्स | १,४५,७४३.०० | |
| ७२,९९१.०० | डेडस्टॉक | ५६,०२३.०० | |
| ७,६७३.०० | ग्रंथालय | ६,९०६.०० | |
| १८,७८८.०० | इलेक्ट्रीक, फिटींग, फिक्चर्स | १,२७,२५४.०० | |
| २,१७,६०९.४८ | इलेक्ट्रिकल इक्विपमेंटस् | २,४७,९०१.०० | |
| २५,९२३.०० | **संगणक व प्रिंटर** | | १७,२८३.०० |
| | **इतर येणी** | | १५,११,९६६.५० |
| २४,८८१.०० | टेली./वीज बयाणा बॅटरी | २४,८८१.०० | |
| ७,११,२१५.०० | येणे व्याज | ४,९८,००७.०० | |
| १,६००.०० | सिलेंडर व रेग्युलेटर बयाणा | १,६००.०० | |
| ५,०००.०० | प्रशिक्षण वर्गणी येणे | ५,०००.०० | |
| २५,५००.०० | वार्षिक वर्गणी येणे | ०.०० | |
| ४,९९,८३४.५८ | वसुली कक्ष येणे (दुबेरजी नोंद) | ३६,५२८.५० | |
| ५०,०००.०० | आगाऊ प्रोसेस फी भरणा | ५०,०००.०० | |
| ५७,५००.०० | येणे वार्षिक वर्गणी (नियमित) | २५,०००.०० | |
| २८,०००.०० | येणे वार्षिक वर्गणी (नाममात्र) | ३८,०००.०० | |
| २४,६६०.०० | येणे जीएसटी | १७,५५०.०० | |
| १,२५,०००.०० | येणे याचिका फी | ६०,०००.०० | |
| ७,५५,४००.०० | येणे सर्व्हिस टॅक्स (अंडर प्रोटेस्ट) | ७,५५,४००.०० | |
| ३,७१,६६,५९०.७८ | एकूण | | ३,९१,६०,१७२.०२ |

| श्री. अनिल नागराळे | सी. ए. महेश धर्माधिकारी | श्री. निपुणराव कोरे |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

## दिनांक १/४/२०१८ ते दिनांक ३१/०३/२०१९ अखेरचे उत्पन्न खर्च पत्रक

